TYBMM
Sem-V

31/3/2016

Journalism: Reporting

**QP Code : 25854**

(2½ Hours) [Total Marks : 75

*N.B.* : (1) **All** questions are **compulsory**.

(2) **Figures** to the **right** indicate **full** marks.

1. Use the inverted pyramid form and apply the principles of reporting to reconstruct a news 250-word/story from the passage given below :— **15**

Explaining the trend observed from the deaths so far, a research scientist from the Parel-based Haffkine Institute said that, delay of treatment was one of the biggest factors contributing to the death toll. "Early diagnosis and treatment have not been seen in half of the cases of victim succumbing to the virus. People have been popping paracetamols and painkillers, instead of rushing to civic-run hospitals or even private clinics," the scientist said. His opinion was seconded by Dr Keskar, who appealed to citizens to head for immediate diagnosis in case of suffering from any preliminary symptoms of the viral infection. As per the latest figures released by the state health department, the disease has already claimed lives of 586 citizens, in past six months, across the three cities, which now have been earmarked as the 'Red Triangle Zone'. According to the department, the count of patients, which till Wednesday was 5,900 across the three cities, continues to rise everyday. "The rise in cases can be attributed to the weather conditions, coupled with unusual rainfall and humidity allowing the virus optimum conditions to grow and spread." Brihanmumbai Municipal Corporation's (BMC) Chief Executive Health officer, Dr Padmaja Keskar said. Swine flu continues to spread across Maharashtra, with cities like Mumbai, Pune and Nashik continuing to bear the worst brunt of the disease. As per the statistics an outbreak was witnessed in the month of July, wherein the rain drought in the state led to a humid atmosphere-resulting in boom for the H1N1 virus. In Mumbai, alone there have been 288 cases of Swine Flu detected in the month of August, with 37 dead so far. On Wednesday, a 64-year-old senior citizen from Wadala succumbed to the H1N1 virus.

[TURN OVER

2. (a) A story does not die a natural death, every story has a follow-up. Justify this statement with relevant examples. 15

OR

(b) (i) Highlight the importance of fact-based reporting or accuracy in reporting. 8

(ii) Explain the need for confidentiality of sources. 7

3. (a) Can a reporter be objective all the time ? Explain how a reporter can be fair and balanced while penning down a news report. Support with examples. 15

OR

(b) (i) What is beat reporting ? How does a report cover a crime beat ? Elaborate with help of examples. 8

(ii) Explain 'white-collar' crimes. 7

4. (a) Using a recent example, outline the differences between investigative journalism and yellow journalism. Also express your opinion on sting operations. 15

OR

(b) (i) Illustrate the various types of leads used in a news story. Can you begin your story with a question ? Kindly support your opinion with examples. 8

(ii) Investigative journalism earns fame, however it is a risky business. Comment by using examples. 7

5. Write short notes on any **three** :— 15

(a) J.J. Hospital death cases.

(b) Harshad Mehta scandal.

(c) Bofors Scam.

(d) Importance of relevant quotes.

(e) Health beat reporting .

---

[TURN OVER

(मराठी रूपांतर)

(२१/२ तास) (एकूण गुण : ७५

सूचना : (१) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
(२) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

१. खालील तथ्यांच्या आधारे बातमीच्या उलटया त्रिकोणाच्या स्वरूपात २५० शब्दांमध्ये बातमी तयार करा. १५

मृत्युच्या घटनांबाबत निरीक्षणे नोंदविताना, परळ येथील हाफकीन इन्स्टीटयूटमधील संशोधक शास्त्रज्ञ म्हणाले की, उपचारातील दिरंगाई हा या मृत्यूस कारणीभूत ठरणाऱ्या अनेक घटकांपैकी सर्वात मोठा घटक आहे. ''विषाणुंमुळे बळी पडलेल्या अर्ध्याहून अधिक रुग्णांमध्ये सुरुवातीचे निदान आणि उपचार यांचा अभाव दिसून आला. लोक नागरी इस्पितळांमध्ये वा अगदी खाजगी इस्पितळांमध्ये सुद्धा न जाता पॅरासिटामोल आणि वेदनाशामक गोळ्या घेत राहिले''. असे हे शास्त्रज्ञ म्हणाले. या मताला दुजोरा देताना डॉ. केसकर यांनी नागरिकांना विषाणूंचा संसर्ग झाल्याची प्राथमिक लक्षणे दिसून येताच तातडीने निदान करून घेण्याचे आवाहन केले. राज्य आरोग्य विभागाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, आता 'लाल त्रिकोण क्षेत्र' म्हणून जाहीर झालेल्या तीन शहरात, गेल्या सहा महिन्यात ५८६ नागरिकांचा, या रोगामुळे मृत्यू ओढवला आहे. विभागाच्या अहवालानुसार या तीन शहरातील रुग्णांची संख्या बुधवार पर्यंत ५९०० होती व ती दरदिवशी वाढतच आहे.' ''विषाणूंच्या वाढीला आणि फैलावाला अत्यंत अनुकूल परिस्थिती निर्माण करून देणारी हवामानाची स्थिती आणि तिच्या जोडीला अकाली पडलेला पाऊस आणि दमटपणा ही बळींच्या संख्येतील वाढींची मुख्य कारणे ठरली आहेत.''

बृहन्मुंबई महानगरपालिका (बी.एम.सी.) आरोग्य विभाग अधिकारी प्रमुख डॉ. पद्मजा केसकर म्हणाल्या. सर्व महाराष्ट्रभर स्वाईन फ्लूचा फैलाव सुरुच आहे व त्यातही मुंबई, पुणे आणि नाशिक या शहरांवर त्याने सर्वाधिक घाला घातला आहे.

संख्याशास्त्रानुसार-रोगाचा उद्भव राज्यातील दुष्काळामुळे निर्माण झालेल्या दमट हवामानामुळे जुलै महिन्यात झाला आणि यामुळे H1N1या विषाणूच्या वाढीला चालना मिळाली.

एकटया मुंबईत ऑगस्ट महिन्यात स्वाईन फ्लूचे २८८ रुग्ण सापडले. यापैकी ३७ जणांचा आतापर्यंत मृत्यु झाला आहे. बुधवारी वडाळा येथील ६४ वर्षाच्या एका जेष्ठ नागरिकाचा H1N1 विषाणूमुळे मृत्यू ओढवला.

२. (अ) कोणत्याही बातमीचा नैसर्गिक मृत्यु होत नाही, तर प्रत्येक बातमीचा पाठपुरावा हा होतच असतो. १५
वरील विधानाचे सोदाहरण स्पष्टीकरण द्या.

किंवा

(ब) (१) तथ्यांच्या आधारे वार्तांकन किंवा वार्तांकनातील 'अचूकता' यांचे बातमीदारीतील महत्त्व स्पष्ट करा. ८
(२) बातमी स्त्रोतांच्या गोपनीयतेची गरज स्पष्ट करा. ७

[TURN OVER

३. (अ) वार्ताहर नेहमीच वस्तुनिष्ठ असू शकतो का ? एखादी बातमी लिहिण्यापूर्वी पत्रकार निःपक्ष आणि वस्तुनिष्ठ कसा राहू शकतो ? उदाहरणांच्या आधारे स्पष्ट करा. १५

किंवा

(ब) (१) 'बीट'चे वार्तांकन म्हणजे काय ? गुन्हे बीटचे वार्तांकन पत्रकार कसे करतो ? उदाहरणांच्या आधारे पटवून द्या. ८

(२) 'व्हाईट कॉलर' गुन्हे - स्पष्ट करा. ७

४. (अ) सध्याच्या काळातील उदाहरणांचा उपयोग करून 'शोध पत्रकारिता' आणि 'पित पत्रकारिता' (yellow journalism) यांतील फरक स्पष्ट करा. तसेच 'स्टिंग ऑपरेशनस्' बद्दल आपले मत मांडा. १५

किंवा

(ब) (१) बातमीत वापरल्या जाणाऱ्या शिरोभागाच्या प्रकारांचे (लीड) विस्तृत विवेचन करा. बातमीची सुरुवात तुम्ही प्रश्नाने करु शकता का ? तुमच्या मताला योग्य उदाहरणांचा आधार द्या. ८

(२) 'शोध पत्रकारितेत प्रसिद्धी मिळवता येते, परंतु हा जोखमीचा प्रकार आहे', पुढील विधानावर उदाहरणांसहित भाष्य करा. ७

५. टिपा लिहा :-(कोणत्याही तीन) :- १५

(अ) जे.जे. मृत्यू सत्र

(ब) हर्षद मेहता प्रकरण

(क) बोफोर्स घोटाळा

(ड) सुयोग्य वक्तव्यांचे महत्त्व

(इ) 'आरोग्य' बीटचे वार्तांकन.

------S------